विद्याविकास
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२५–२६/०५०     दिनांक: १८/०७/२०२५

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग.

**विषय : व्हिजन डॉक्युमेंट २०४७ घोषवाक्य स्पर्धेबाबत.**
संदर्भ : उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे युएनआय/विशि–१/टे.क्र. ४०/ई–१९६८१७५ दिनांक १७ जुलै, २०२५ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, १५० दिवसांच्या कार्यक्रमांर्तगत विकसित महाराष्ट्र २०४७ चे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यातबाबतच्या विस्तृत सूचना शासन निर्णय नियोजन विभाग दि. २ जून, २०२५ अन्वये देण्यात आलेल्या आहेत.

शासन निर्णयातील अनु.क्र. ६ नुसार व्हिजन डॉक्युमेंट साठी तथा याअंतर्गत घोषवाक्य निश्चित करण्यासाठी विविध घटकांकडून नाविण्यपूर्ण कल्पना/संकल्पना प्राप्त करून घेण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत विद्यापीठातील/महाविद्यालयातील अधिष्ठाता/प्राचार्य/शिक्षक/प्रशासकीय अधिकारी/शिक्षकेतर कर्मचारी/विद्यार्थी/विद्यार्थी पालक यांच्याकरिता स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या स्पर्धकाचे नाव शासनास पाठविण्याबाबतचे निर्देश प्राप्त झाले आहे. स्पर्धेचे घोषवाक्य अंतिम करताना १. प्रगतशील, २. शाश्वत, ३. सर्वसमावेशक व ४. सुशासन या ४ आधारस्तंभाचा विचार करण्यात यावा. आपल्या विभागातील/महाविद्यालयातील सहभागी स्पर्धकांची माहिती घोषवाक्यासह खाली दिलेल्या नमुन्याप्रमाणे विद्यापीठातील/महाविद्यालयातील अधिष्ठाता/प्राचार्य/शिक्षक/प्रशासकीय अधिकारी/शिक्षकेतर कर्मचारी/विद्यार्थी यांनी **आपल्या विभागाच्या अथवा महाविद्यालयाच्या लेटरहेड वरती विभागप्रमुख/प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसह सोबत जोडलेल्या स्पर्धकांच्या हमीपत्रासह bsd@unipune.ac.in या मेल आईडीवर शनिवार, दि. २६ जुलै, २०२५ पर्यंत पाठवावे.**

या संबंधिचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. सदर पत्र आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागातील मुख्य सूचना फलकावर प्रदर्शित करून सर्वांच्या निदर्शनास आणून प्रत्येक घटकाला स्पर्धेत सहभागी होण्यास प्रोत्साहीत करावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ

# व्हिजन डॉक्युमेंट २०४७ घोषवाक्य स्पर्धा

(विद्यापीठातील/महाविद्यालयातील अधिष्ठाता/ प्राचार्य/शिक्षक/प्रशासकीय अधिकारी/शिक्षकेतर कर्मचारी/विद्यार्थी)

## <u>हमीपत्र</u>

दिनांक :  /०७/२०२५

मी ......................................................................., .................

...................................................................... विद्यापीठात/महाविद्यालयात अधिष्ठाता/प्राचार्य/शिक्षक/प्रशासकीय अधिकारी/शिक्षकेतर कर्मचारी/विद्यार्थी/पालक असे लिहून देतो/देते की, या व्हिजन डॉक्युमेंट—२०४७ घोषवाक्य स्पर्धेत मी स्वैच्छेने सहभागी होत असून या स्पर्धेकरिता खाली लिहून दिलेले घोषवाक्य मी स्वत: तयार केलेले आहे.

| **स्पर्धक संपर्क क्र.** | **वैयक्तिक ईमेल** | **कार्यालयीन ईमेल** |
|---|---|---|
| | | |
| **घोषवाक्य (मराठीमध्ये ५ ते १० इतक्या शब्दात)** | | |
| घोषवाक्य<br><br>..................................................................................................... | | |

या स्पर्धेकरिता नियुक्त केलेल्या परीक्षकांचा निर्णय मला मान्य असेल.

स्पर्धकाची स्वाक्षरी

विभागप्रमुख/प्राचार्य
स्वाक्षरी व शिक्का

# व्हिजन डॉक्युमेंट २०४७ घोषवाक्य स्पर्धा

(पालक व अन्य यांचेकरिता)

## हमीपत्र

दिनांक :     /०७/२०२५

मी ......................................................................., ..................

....................................................................... राहणार असे लिहून देतो/देते की, या व्हिजन डॉक्युमेंट—२०४७ घोषवाक्य स्पर्धेत मी स्वैच्छेने सहभागी होत असून या स्पर्धेकरिता खाली लिहून दिलेले घोषवाक्य मी स्वत: तयार केलेले आहे.

| स्पर्धक संपर्क क्र. | वैयक्तिक ईमेल | कार्यालयीन ईमेल |
|---|---|---|
| | | |
| **घोषवाक्य (मराठीमध्ये ५ ते १० इतक्या शब्दात)** | | |
| घोषवाक्य<br><br>.................................................................................................... | | |

या स्पर्धेकरिता नियुक्त केलेल्या परीक्षकांचा निर्णय मला मान्य असेल.

स्पर्धकाची स्वाक्षरी

**महाराष्ट्र शासन**

**उच्च शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,**

**४१२ई,बहिरट पाटील चौक,मॉडेल कॉलनी,शिवाजीनगर,पुणे४११०१६**

Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक-युएनआय/विशि-१/टे.क्र.४०/ई-१९६८१७५

प्रति,

१.कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे,
२.कुलसचिव, सर्व स्वयंअर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे,
३.कुलसचिव, समूह विद्यापीठे
४.कुलसचिव, अनुदानित अभिमत विद्यापीठे.

**विषय** **Vision Document साठी घोषवाक्य निश्चित करणेबाबत**

संदर्भ शासनपत्र क्रमांक HTED-२०११/१०२/२०२५-MHT(EST२) दि.११ जुलै, २०२५

उपरोक्त विषयाबाबतचे शासनाचे पत्र व सहपत्रे सोबत जोडली आहेत, कृपया अवलोकनी घ्यावीत.

वरील संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, १५० दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत विकसित महाराष्ट्र २०४७ चे vision Document तयार करण्याबाबतच्या विस्तृत सूचना शासन निर्णय नियोजन विभाग दि.२ जून, २०२५ अन्वये देण्यात आलेल्या आहेत. राज्याच्या प्रादेशिक संतुलित विकासाला चालना देण्याकरिता १. प्रगतीशील २.शाश्वत ३. सर्वसमावेशक व ४.सुशासन असे ४ प्रमुख आधारस्तंभ निश्चित करण्यात आले आहेत.

तसेच क्षेत्रनिहाय गट व संयोजक स्थापन करण्यात आले असून विकसित महाराष्ट्र २०४७ Vision Document तयार करण्यासाठी मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. या संदर्भात नागरीक सर्व्हेक्षण अभियानही राबविण्यात येत आहे. या शासन निर्णयातील अ.क्र.६ येथे Vision Document साठी तथा याअंतर्गत घोषवाक्य निश्चित करण्यासाठी विविध घटकांकडून नाविण्यपूर्ण कल्पना/संकल्पना प्राप्त करून घेण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत स्पर्धा आयोजित करण्यासंदर्भात निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने घोषवाक्य स्पर्धेसाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत. त्याचे पालन करण्यात यावे.

१.राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे, समूह विद्यापीठे, अनुदानित अभिमत विद्यापीठे यांनी आपआपल्या स्तरावर घोषवाक्य स्पर्धा आयोजित कराव्यात.

३.घोषवाक्य अंतिम करताना १. प्रगतीशील२.शाश्वत ३. सर्वसमावेशक व ४.सुशासन या ४ आधारस्तंभाचा विचार करण्यात यावा.

४.घोषवाक्य स्पर्धेमध्ये सर्व संबंधित घटकांचा (विद्यापीठातील अधिष्ठाता, अध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थ्यांचे पालक, प्रशासकीय काम पाहणारे अधिकारी व कर्मचारी, महाविद्यालयीन प्राचार्य, अध्यापक विद्यार्थी, पालक, प्रशासकीय काम करणारे अधिकारी व कर्मचारी ) यांचा समावेश करण्यात यावा.

५.सदर घोषवाक्य स्पर्धेचे नियोजन, आयोजन, स्पर्धा आयोजन समिती, स्पर्धेसंदर्भातील नियम व अटी शर्ती, इ. सर्व कार्यवाही विद्यापीठांनी आपल्या स्तरावरून करण्यात यावी.

६. घोषवाक्य मराठीमध्ये पाच ते दहा इतक्या मोजक्या शब्दात असावे.

या स्पर्धेतील प्रथम, व्दितीय व तृतीयक्रमांक प्राप्त करणाऱ्या पुरस्कार्थींचा संपूर्ण तपशील खालील निकालपत्र तक्त्यात संचालनालयास **दि.३१ जुलै, २०२५ पर्यंत** vishi.dhepune@nic.in या ईमेलवर पाठविण्यात यावा.

**निकालपत्र**

**विद्यापीठाचे नाव**

| क्र. | पुरस्कार प्राप्त व्यक्तिचे संपुर्ण नाव | व्यवसाय (नोकरी/विद्यार्थी / पालक/ व्यावसायिक) | घोषवाक्य (मराठी मध्ये ५ ते १० इतक्या शब्दात) | भ्रमणध्वनी क्रमांक | वैयक्तिक ईमेल | कार्यालयीन ईमेल |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रथम | | | | | | |
| व्दितीय | | | | | | |
| तृतीय | | | | | | |

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 16-07-2025 17:28:11

**(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

**प्रत-माहितीस्तव सादर**
मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२
**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी**
१.संचालक, कला संचालनालय, मुंबई
२.सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य
२/- त्यांना कळविण्यात येते की, सदर घोषवाक्य स्पर्धा संदर्भात विद्यापीठाशी प्रत्यक्ष संपर्क साधून सदरील स्पर्धा विहित वेळेत आयोजित करून स्पर्धेचा निकाल विहित कालमर्यादेत संचालनालयास विद्यापीठातर्फे सादर होईल याबाबतची सर्व दक्षता विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांनी घ्यावी.

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
Email ID:-do.asthahte-mh@gov.in

---

क्रमांक :- HTED-२०११/१०२/२०२५-MHT-(EST२)    दिनांक :- ११ जुलै, २०२५

**प्रति,**
**१) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**२) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**विषय :- Vision Document साठी घोषवाक्य व बोधचिन्ह निश्चित करणेबाबत**

संदर्भ :- नियोजन विभागाचा शासन निर्णय क्र.विमहा-२०२५/प्र.क्र.०५/का.१४१४, दिनांक ०२ जून, २०२५

**महोदय,**

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन शासन निर्णयाचे कृपया अवलोकन व्हावे (प्रत सोबत जोडली आहे)

२. १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत विकसित महाराष्ट्र- २०४७ चे Vision Document तयार करण्याबाबतच्या विस्तृत सूचना उपरोक्त शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर शासन निर्णयातील अनुक्रमांक ६ येथे खालीलप्रमाणे नमूद आहे:-

"घोषवाक्य व बोधचिन्ह (Slogan & Logo):-

Vision Document साठी घोषवाक्य व बोधचिन्ह निश्चित करण्यासाठी विविध घटकांकडून नाविन्यपूर्ण कल्पना/ संकल्पना प्राप्त करुन घेण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत स्पर्धा आयोजित करण्यात येतील. अंतिम करावयाचे घोषवाक्य व बोधचिन्ह हे १) प्रगतीशील २) शाश्वत ३) सर्वसमावेशक व ४) सुशासन या ४ आधारस्तंभांशी निगडित असावे."

३. वरील अनुषंगाने Vision Document साठी घोषवाक्य व बोधचिन्ह निश्चित करण्यासाठी विविध घटकांकडून नाविन्यपूर्ण कल्पना/ संकल्पना प्राप्त करुन घेण्यासाठी स्पर्धा आयोजित करण्याची कार्यवाही संचालक (उच्च शिक्षण) व संचालक (कला) यांनी परस्पर समन्वयाने करावी व संचालक (उच्च शिक्षण) यांनी त्याबाबतचा अंतिम अहवाल शासनास सादर करावा. तसेच अंतिम करावयाचे घोषवाक्य व बोधचिन्ह

हे १) प्रगतीशील २) शाश्वत ३) सर्वसमावेशक व ४) सुशासन या ४ आधारस्तंभांशी निगडित असेल याबाबतची दक्षता घ्यावी. सदर कार्यवाही करत असताना करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची टप्पेनिहाय सद्यस्थिती वेळोवेळी संचालक (उच्च शिक्षण) यांनी या विभागास अवगत करावी, ही विनंती.

Digitally signed by
Gauri Rahul Mhaske
Date: 11-07-2025
11:48:40

सोबत:- वरीलप्रमाणे

(गौरी रा. म्हस्के)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

१५० दिवसांचा कार्यक्रम
विकसित महाराष्ट्र - २०४७ चे Vision Document तयार करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक : विमहा-२०२५ /प्र.क्र. ०५/का. १४१४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : ०२ जून, २०२५.

**वाचा :-** १) नियोजन विभाग शासन निर्णय क्र.विमहा-२०२५/प्र.क्र.५(१)/का-१४१४, दि.१७.०४.२०२५.
२) नियोजन विभाग शासन निर्णय क्र.विमहा-२०२५/प्र.क्र.५(२)/का-१४१४, दि.१७.०४.२०२५.

**प्रस्तावना :-**

भारत सरकारकडून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारताला सन २०४७ पर्यंत “विकसित भारत - भारत @ २०४७ ( India @ २०४७ )” करण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे. यामध्ये सन २०२५-२६ पर्यंत भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट्य जाहिर केले आहे. विकसित भारताची उद्दिष्ट्ये साध्य करीत असताना भारतातील राज्यांनासुध्दा सन २०४७ पर्यंत संपूर्णपणे विकसित होणे गरजेचे आहे. याद्दष्टीने महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सन २०२७ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर व सन २०४७ पर्यंत ३.५ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविणे हे राज्याचे मुख्य ध्येय आहे. राज्याच्या ध्येयाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने तसेच प्रत्येक क्षेत्राचा ठसा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर उमटावा यासाठी विकसित महाराष्ट्र २०४७ चे व्हिजन जाहिर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यासाठी नीति आयोगाने एक व्यापक दृष्टीकोन आणि धोरणात्मक रोडमॅप तयार करण्यासाठी मॅकेन्झी अँड कंपनी या सल्लागार कंपनीची नियुक्ती केली आहे. विविध विभागाच्या सचिवांशी चर्चा करुन मॅकेन्झी अँड कंपनीचे सल्लागारांमार्फत Vision Document तयार करण्यात येत आहे.

विकसित महाराष्ट्र - २०४७ चे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता विकसित महाराष्ट्राची संकल्पना मूर्त स्वरुपात मांडण्यासाठी वाचा क्र.१ येथील दि.१७.०४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली “सल्लागार समिती” तसेच, मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली “समन्वय समिती” स्थापन करण्यात आली आहे. तसेच, यासाठी वाचा क्र.२ येथील दि.१७.०४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये कृषि व संलग्न क्षेत्र, उद्योग व सेवा क्षेत्र, पायाभूत सुविधा क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, प्रशासन व पर्यावरण इ. क्षेत्राच्या “क्षेत्रनिहाय अभ्यास समित्या” गठीत करण्यात आल्या आहेत.

राज्य शासनाच्या १०० दिवसाच्या समारोपाच्या दि. ०७ मे,२०२५ रोजीच्या कार्यक्रमावेळी मा. मुख्यमंत्री महोदयांनी भविष्यातील वाटचालीसाठी विकसित महाराष्ट्र २०४७ च्या अनुषंगाने Vision Document तयार करण्यासाठी दि. ०६ मे ते ०२ ऑक्टोबर, २०२५ अशा १५० दिवसाच्या कार्यक्रमाची घोषणा केली. त्यास अनुसरुन विकसित महाराष्ट्र- २०४७ चे Vision Document तयार करण्यासाठी विस्तृत सूचना देण्याची, तसेच क्षेत्रनिहाय समित्यांमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ०६.०५.२०२५ ते दिनांक ०२.१०.२०२५ या कालावधीत १५० दिवसांचा कार्यक्रम राबविण्याची घोषणा केली आहे. त्यामध्ये विकसित महाराष्ट्र@२०४७ करिता Vision Document तयार करण्याचा समावेश करण्यात आला आहे. विकसित महाराष्ट्र २०४७ चे Vision Document तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे टप्पे ठरविण्यात आले आहेत.

१.१ दीर्घकालीन उद्दिष्टे - महाराष्ट्र @ २०४७ (दि.१५ ऑगस्ट, २०४७) :- भारताच्या शताब्दी महोत्सवापर्यंत गाठावयाची उद्दिष्टे

१.२ मध्यमकालीन उद्दिष्टे - महाराष्ट्र@७५ (दि.१ मे, २०३५) :- महाराष्ट्राच्या अमृत महोत्सवापर्यंत गाठावयाची उद्दिष्टे

१.३ अल्पकालीन उद्दिष्टे - पंचवार्षिक / वर्षनिहाय उद्दिष्टे :- दि. २ ऑक्टोबर, २०२९ पर्यंतच्या पाच वर्षात वर्षनिहाय गाठावयाची उद्दिष्टे

पंचवार्षिक कालावधीमध्ये साध्य करावयाच्या अल्पकालीन उद्दिष्टांच्या अनुषंगाने संबंधित विभागांनी वार्षिक व पंचवार्षिक उद्दिष्टे व त्यांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आराखडा तयार करावा.

### २. प्रमुख आधारस्तंभ :-

राज्याच्या प्रादेशिक संतुलित विकासाला चालना देण्याकरिता **प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक व सुशासन** असे चार प्रमुख आधारस्तंभ निश्चित करण्यात आले आहेत. क्षेत्रनिहाय गटांनी या आधारस्तंभांना केंद्रस्थानी ठेवून Vision Document चा मसुदा तयार करावयाचा आहे.

### ३. क्षेत्रनिहाय गट व संयोजक :-

विकसित महाराष्ट्र - २०४७ च्या Vision Document चा मसुदा तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे क्षेत्रनिहाय गट स्थापन करण्यात येत आहेत:-

| अ.क्र. | क्षेत्र | संबंधित विभाग | संयोजक |
|---|---|---|---|
| १ | कृषि | • कृषि<br>• पशुसंवर्धन<br>• दुग्धव्यवसाय<br>• मत्स्यव्यवसाय<br>• सहकार<br>• पणन<br>• अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण | १) श्री.विकास रस्तोगी, प्रधान सचिव (कृषि)<br>२) श्री.प्रवीण दराडे, प्रधान सचिव (सहकार व पणन) |
| २ | शिक्षण | • शालेय शिक्षण<br>• उच्च व तंत्र शिक्षण<br>• कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता | १) श्री.वेणुगोपाल रेड्डी, अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण)<br>२) श्री.रणजितसिंह देओल, प्रधान सचिव (शालेय शिक्षण) |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | आरोग्य | • सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण<br>• वैद्यकीय शिक्षण<br>• अन्न व औषध प्रशासन | १) डॉ.निपुण विनायक, सचिव (सार्वजनिक आरोग्य)<br>२) श्री.धीरज कुमार, सचिव (वैद्यकीय शिक्षण) |
| ४ | ग्राम विकास | • ग्रामविकास व पंचायत राज<br>• आदिवासी विकास | १) श्री.एकनाथ डवले, प्रधान सचिव (ग्रामविकास)<br>२) श्री.विजय वाघमारे, सचिव (आदिवासी विकास) |
| ५ | नगर विकास | • नगरविकास-१<br>• नगरविकास-२<br>• गृहनिर्माण | १) श्री.असीमकुमार गुप्ता, अपर मुख्य सचिव (नगरविकास-१)<br>२) श्री.के.एच. गोविंदराज, प्रधान सचिव (नगरविकास-२ |
| ६ | भूसंपदा | • महसूल<br>• वने<br>• पर्यावरण व वातावरणीय बदल<br>• खारभूमी विकास | १) श्री.राजेशकुमार, अपर मुख्य सचिव (महसूल)<br>२) श्री.मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव (वने) |
| ७ | जल संपदा / पाणी | • जलसंपदा<br>• पाणी पुरवठा व स्वच्छता<br>• मृद व जलसंधारण<br>• रोजगार व हमी योजना | १) श्री.दीपक कपूर, अपर मुख्य सचिव (जलसंपदा)<br>२) श्री.संजय खंदारे, प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता) |
| ८ | पायाभूत सुविधा | • सार्वजनिक बांधकाम<br>• ऊर्जा<br>• परिवहन<br>• विमानचालन<br>• बंदरे | १) श्रीमती मनिषा म्हैसकर, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम)<br>२) श्रीमती आभा शुक्ला, अपर मुख्य सचिव (ऊर्जा)<br>३) श्री.संजय सेठी, अपर मुख्य सचिव (परिवहन व बंदरे) |
| ९ | वित्त | • वित्त<br>• नियोजन<br>• महसूल (नोंदणी व मुद्रांक)<br>• राज्य उत्पादन शुल्क | १) श्री.ओ.पी. गुप्ता, अपर मुख्य सचिव, (वित्त)<br>२) श्री.सौरभ विजय, प्रधान सचिव (वित्त-व्यय) |
| १० | उद्योग | • उद्योग<br>• कामगार<br>• खनिकर्म<br>• वस्त्रोद्योग | १) श्री.पी.अन्बलगन, सचिव (उद्योग)<br>२) श्रीमती आय.ए. कुंदन, प्रधान सचिव (कामगार) |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | सेवा | • नियोजन<br>• वित्त<br>• माहिती तंत्रज्ञान | १) श्री.संतोषकुमार, अपर मुख्य सचिव (सा.प्र.वि.) व विशेष कार्य अधिकारी (अपील्स)<br>२) श्रीमती रिचा बागला, प्रधान सचिव (वित्त - लेखा व कोषागारे) |
| १२ | सामाजिक विकास | • सामाजिक न्याय<br>• आदिवासी विकास<br>• इतर मागास वर्ग व बहुजन कल्याण<br>• महिला व बाल विकास<br>• दिव्यांग कल्याण<br>• अल्पसंख्याक विकास | १) श्रीमती मनिषा वर्मा, अपर मुख्य सचिव (कौशल्य, रो.उ. व ना.)<br>२) श्री.हर्षदिप कांबळे, प्रधान सचिव (सामाजिक न्याय ) |
| १३ | सुरक्षा | • गृह<br>• आपत्ती व्यवस्थापन<br>• विधी व न्याय | १) श्री.इक्बालसिंह चहल, अपर मुख्य सचिव (गृह)<br>२) श्रीमती सोनिया सेठी, अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) |
| १४ | सॉफ्ट पॉवर | • सांस्कृतिक कार्य<br>• पर्यटन<br>• क्रीडा<br>• मराठी भाषा<br>• माहिती व जनसंपर्क<br>• राजशिष्टाचार | १) श्री.विकास खारगे, अपर मुख्य सचिव (सांस्कृतिक कार्य)<br>२) श्री.अतुल पाटणे, प्रधान सचिव (पर्यटन) |
| १५ | तंत्रज्ञान | • माहिती तंत्रज्ञान<br>• कृषि<br>• उद्योग | १) श्री.संजय सेठी, अपर मुख्य सचिव (परिवहन व बंदरे)<br>२) श्री.पराग जैन, प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान) |
| १६ | मानव विकास / मनुष्यबळ व्यवस्थापन | • सा. प्र. वि.<br>• प्रशासकीय सुधारणा व नाविन्यता | १) श्रीमती व्ही. राधा, अपर मुख्य सचिव (सा.प्र.वि.)<br>२) श्री.निरंजन सुधांशू, महासंचालक,यशदा |

उपरोक्त क्षेत्रनिहाय गटांमध्ये सहभागी असलेल्या संयोजकांमध्ये बदल झाल्यास त्या पदावर कार्यरत सचिव यांनी संयोजक म्हणून कार्यभार सांभाळावा.

क्षेत्रनिहाय संयोजकांनी मसुद्याच्या आखणीच्या प्रक्रियेमध्ये त्यांच्या क्षेत्राशी संबंधित विभागांना तसेच संबंधित विभागांतर्गत येणारी सर्व आयुक्तालये / संचालनालये, शासकीय मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, अभिकरणे आणि कंपन्या यांचे प्रमुख, संबंधित क्षेत्रीय अधिकारी यांना सामाविष्ट करून

घ्यावे. आवश्यकतेनुसार आपल्या क्षेत्रातील तज्ञ , नामांकीत व्यक्ती ,उद्योजक, नीती आयोगातील क्षेत्र-तज्ञ अथवा अन्य व्यक्तींना देखील सहभागी करावे.

**४. विकसित महाराष्ट्र - २०४७ Vision Document तयार करण्यासाठी मार्गदर्शक सूचना :-**

i. सदर Vision Document तयार करताना सन २०२९, २०३५ व २०४७ मध्ये येणारी आव्हाने, उपलब्ध होणाऱ्या संधी व बदलणारे तंत्रज्ञान यांचा विचार करण्यात यावा.

ii. भारत सरकारचा विकसित भारत २०४७ चा अहवाल, महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेचा अहवाल, मुंबई महानगर प्रदेश (MMR) Growth Hub Document विचारात घ्यावेत.

iii. संबंधित विभागाने संयोजक अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या ज्ञान, अनुभव व कौशल्याचा उपयोग करुन घेऊन Vision Document तयार करावे. याकरीता त्यांच्या विभागात कार्यरत असलेल्या निवडक अधिकाऱ्यांबरोबर सल्लामसलत / चर्चासत्र आयोजित करावेत.

iv. संबंधित क्षेत्रामधील तज्ञ, नामांकित व शासकीय संस्था, स्वंयसेवी संस्था यांच्याशी सल्लामसलत / चर्चासत्र आयोजित करुन त्यांच्याकडून याबाबत सूचना / संकल्पना / अभिप्राय प्राप्त करुन घ्यावेत.

v. सदर Vision Document बाबत मा.मंत्री / मा.राज्यमंत्री महोदय यांचे मार्गदर्शनाखाली उपरोक्त कार्यवाही करावी.

**५. नागरिक सर्वेक्षण (Citizen Survey) :-**

i. राज्यातील नागरिकांच्या विकसित महाराष्ट्र २०४७ संदर्भातील मते, अपेक्षा, अभिप्राय, आकांक्षा व प्राथम्यक्रम जाणून घेण्यासाठी नियोजन विभागामार्फत माहिती व जनसंपर्क विभागाच्या मदतीने राज्यस्तरिय सर्वेक्षण अभियान राबविण्यात येईल.

ii. जिल्हास्तरीय सर्वेक्षणासाठी जिल्हाधिकारी कार्यालय व अन्य शासकीय कार्यालयांचा सहभाग घेण्यात येईल.

iii. **सर्वेक्षणासाठी विविध समाज माध्यमांचा / प्रसार माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात यावा. यासाठी येणारा खर्च** माहिती व जनसंपर्क विभागाच्या सन २०२५-२६ च्या मंजूर तरतूदीतून भागवावा.

**६. घोषवाक्य व बोधचिन्ह (Slogan & Logo) :-**

Vision Document साठी घोषवाक्य व बोधचिन्ह निश्चित करण्यासाठी विविध घटकांकडून नाविन्यपूर्ण कल्पना / संकल्पना प्राप्त करुन घेण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत स्पर्धा आयोजित करण्यात येतील. अंतिम करावयाचे घोषवाक्य व बोधचिन्ह हे १)प्रगतीशील २)शाश्वत ३)सर्वसमावेशक व ४) सुशासन या ४ आधारस्तभांशी निगडित असावे.

## ७. टप्पानिहाय तपशील व वेळापत्रक:-

उपरोक्तप्रमाणे नमूद करण्यात आल्यानुसार चर्चा/सल्लामसलत करून अंतिम Vision Document तयार करण्यासाठीचा टप्पानिहाय तपशील व वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | अपेक्षित कार्यवाही | कालमर्यादा |
|---|---|---|
| **अ** | **विभागीय अधिकाऱ्यांशी सल्लामसलत (कल्पना सूचना, प्रमुख आव्हाने, चालू प्रकल्प)** | **५ जून २०२५** |
| **ब** | **विभागस्तरीय नागरिक सर्वेक्षण** | **२७ जून, २०२५** |
| **क** | **विभागाचे सचिव आणि संयोजकांच्या नेतृत्वाखाली बाहेरील तज्ञांशी व मित्र सोबत चर्चा / सल्लामसलत** | **१३ जून २०२५** |
| **ड** | **प्राप्त कल्पना व Vision Document ला मूर्त स्वरुप देणे** | |
| | १) Vision Document चे प्रारुप तयार करण्याकरीता प्राप्त संकल्पना / उद्दिष्टे, कृती आराखडा यांचे संकलन करणे. समन्वय समितीने वेळोवेळी आढावा घेणे. | २५ जुलै २०२५ |
| | २) Vision Document चा प्रारुप मसुदा तयार करणे. | १५ ऑगस्ट, २०२५ |
| **इ** | **Vision Document मसुदा अंतिम करणे** | **०२ ऑक्टोबर, २०२५** |

## ८. समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती :-

क्षेत्र संयोजकांनी व सर्व संबंधित विभागांनी Vision Document तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये संबंधित घटकांशी समन्वय ठेवण्यासाठी उप सचिव किंवा त्यापेक्षा वरील दर्जाच्या अधिकाऱ्याची “विभागीय समन्वय अधिकारी” म्हणून नियुक्ती करावी.

## ९. विकसित महाराष्ट्र - २०४७ Vision Document चे सनियंत्रण :-

राज्यस्तरावर व जिल्हास्तरावर Vision Document च्या आखणीच्या कामाचे सनियंत्रण नियोजन विभागाद्वारे करण्यात येईल. सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, पोलिस महासंचालक, पोलिस आयुक्त/अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, तसेच सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/महामंडळे व अन्य आस्थापना यांनी Vision Document तयार करण्याकरीता क्षेत्र संयोजकांना व नियोजन विभागास सर्वतोपरी सहकार्य करावे.

विकसित महाराष्ट्र २०४७ Vision Document तयार करण्यासाठी Knowledge Partner म्हणून नीति आयोगाने मॅकेन्झी अँड कंपनीचे सल्लागार नियुक्त केले आहेत. सर्व क्षेत्र संयोजकांनी त्यांचा उपयोग करावा.

**१०.** प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०६०२१८२५१८२५१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

DEVARA RAJAGOPAL

Digitally signed by DEVARA RAJAGOPAL
DN: c=IN, o=Personal, title=3456, 2.5.4.20=289c22071cb588fd531df022c29ec89276ede6f8aa500df11ff3b1b80b6962cd, postalCode=411014, st=Maharashtra, serialNumber=742368efbe36a0eb883c9937836383a8be11eb15decb8029209db2953176e175, cn=DEVARA RAJAGOPAL
Date: 2025.06.02 18:28:17 +05'30'

**( डॉ. राजगोपाल देवरा )**
**अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. सर्व सन्माननीय सदस्य, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
९. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
११. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१२. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री महोदय यांचे खाजगी सचिव,
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, नीति आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली.
१४. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
१५. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), विधानभवन, मुंबई,
१६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), विधानभवन, मुंबई,
१७. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र), मुंबई,
१८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१९. सर्व विभागीय आयुक्त/ सर्व जिल्हाधिकारी/ सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
२०. आयुक्त, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, १८ वा मजला ,नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालय, मुंबई-५२.
२१. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२२.निवडनस्ती, कार्यासन-१४१४, नियोजन विभाग.